# पोलीस आयुक्तालय
## मिरा-भाईंदर, वसई-विरार

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक :- ०८/१०/२०२२

## सप्टेबर महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

१) दिनांक २६/०७/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा.च्या सुमारास वसई पोलीस ठाण्याचे हद्दीतील सर्वे नं १५७ भुईगाव कळंब खाडीच्या ठिकाणी पाण्यात किना-यावर एक अर्धवट उघड्या रेग्जीनच्या ट्रॉली बॅगेमधुन घाण वास येत असल्याने ती बॅग खाडीच्या पाण्यातुन बाहेर काढली असता त्यात अंदाजे २० वर्षापेक्षा जास्त वयोगटातील स्त्री जातीचा मृतदेह शिर नसलेले धड अशा स्थितीत दिसुन आला. त्या मृतदेहावर उजव्या हातावर लाल काळ्या रंगाचे माराचे व्रण तसेच मानेवर धारधार शस्त्राने महिलेचे धड अलग केल्याचे दिसुन आले. त्यावरुन वसई पोलीस ठाण्यात दिनांक २६/०७/२०२१ रोजी भा.दं.वि.सं. कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर महिलेचे शिर हे धडापासून वेगळे केले असल्याने मयत महिलेची ओळख पटविणे जिकरीचे असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून यातील मयत महिलेची ओळख पटवून सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपायुक्त, परिमंडळ २, श्रीमती पद्मजा बढे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनानुसार वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली व त्यानुसार आयुक्तालातील तसेच लगतचे मुंबई, ठाणे, ठाणे ग्रामीण, पालघर जिल्हयातील व राज्यातील मिसिंग महिलांची माहिती प्राप्त करुन अनोळखी मयत महिलेशी, तिने परिधान केलेल्या कपडयांचे साधर्म्य तपासण्यात आले. दमण, वापी, गुजरात या ठिकाणी कोस्टल पोलीस ठाणे हद्यीतील मिसिंग महिलांचा तपास केला गेला होता.

त्यादरम्यान दिनांक २९/०८/२०२२ रोजी आचोळे पोलीस ठाणे येथे महिला नामे कमरुनिसा मोहम्मद अली निपानी रा. बेळगाव, कर्नाटक यांनी मनुष्य मि.रजि.नं ११२/२०२२ प्रमाणे तक्रार दिली होती. त्यात त्यांची नात नामे सानिया आसिफ शेख वय २४ वर्षे, रा. नालासोपारा (पुर्व) हि मागील १३ महिन्यापासुन बेपत्ता असल्याबाबत खबर होती. सदर मिसिंग दिर्घ कालावधीनंतर दाखल करण्यात आली असल्याने व तिचे वर्णन हे वसई पोलीस ठाणेकडील दाखल गुन्हयांतील अनोळखी मयत महिलेच्या वर्णनाशी मिळते-जुळते असल्याने नमुद खबर देणारी महिला व मिसिंगचे नातेवाईक यांचेकडे चौकशी केली असता बेपत्ता महिला हिचे पती आसिफ हनिफ शेख, रा. नालासोपारा (पुर्व) यांनी ती बेपत्ता झालेबाबत कोठेही पोलीस ठाण्यात खबर दिली नसल्याचे व ते नमुद राहता पत्ता सोडुन मुंब्रा येथे राहण्यास गेले असल्याचे समजले. एकंदरीत सर्व प्रकार हा संशयास्पद असल्याने बेपत्ता महिलेचा पतीकडे सखोल चौकशी केली असता सदरची महिला ही गुन्हयांतील अनोळखी मयत महिला असल्याचे व त्यानेच तिला जिवे ठार मारल्याचे निष्पन्न झाल्याने तिचा पती नामे आसिफ हनिफ शेख यास दिनांक १४/०९/२०२२ रोजी नमूद गुन्हयात अटक करुन सदर गुन्हा उघडकीस आणला होता.

सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासून यातील मयत महिलेची ओळख व अज्ञात आरोपीताचा शोध लागणे फार कठिण झालेले असतांना वसई पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने अविरत परिश्रम घेवून तसेच इतर पोलीस स्टेशनला दाखल होणाऱ्या सर्व मनुष्य मिसींग प्रकरणांवर लक्ष ठेवून सदरचा गुन्हा उघडकीस आणल्याने श्री. कल्याणराव कर्पे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे, श्री. ऋषीकेष पवळ, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. अब्दुलहक देसाई, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि राम सुरवसे, सुनिल पवार, सागर चव्हाण, पोउनि विष्णू वाघमोडे, स.फौ. जयंत पाटणकर, पो.हवा. सुनिल मलावकर, पो.हवा. विनोद पाटील, पो.ना.मिलिंद घरत, पो.अं. शरद पाटील, विनायक कचरे, सुर्यकांत मुंढे, भरत शेलार, बाळू गर्जे, नांदगांवकर, अमोल बडे यांचा दिनांक ०८/१०/२०२२ रोजी मा. श्री. सदानंद दाते, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **'सप्टेबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल' क्रमांक-१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री कल्याणराव करपे.**

२) दिनांक २७/०८/२०२२ रोजी तक्रारदार महिला नामे सौ.काजल रिंकी वाघेला, वय-२६ वर्षे यांनी विरार पोलीस ठाणे येथे तक्रार दिली की, त्यांचे पती नामे रिकी धमेंद्र वाघेला वय २९ वर्षे, धंदा - पे-टीएम विक्री, रा. शिवशरण हौसिंग सोसायटी, शिवकृपा कॉम्प्लेक्स, नारंगी फाटक, विरार पुर्व हे दिनांक २६/०८/२०२२ रोजी सकाळी कामावर गेले असुन ते अद्यापपावेतो परत घरी आलेले नाही. सदर तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसीग नं-२१७/२०२२ नोंद करण्यात आली होती. दिनांक २७/०८/२०२२ रोजी मिसिंग व्यक्ती याचा मोबाईल हा न्यु विवा कॉलेज, डि-मार्ट परीसर, विरार प. येथील परीसरात विवा कॉलेजमध्ये शिक्षण घेत असणाऱ्या मुलाला मिळाला होता. सदरचा मोबाईल बाबत त्याच्याकडे चौकशी केली असता तो मोबाईल बंद स्थितीत भेटलेबाबत माहिती त्या मुलाने दिली. मिसिंग व्यक्ती यांची पत्नी यांच्याकडे चौकशी केली असता मिसिंग व्यक्ती हे दिनांक २६/०८/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास जयेश पांचाळ यांच्या युनिटेक विरार प. येथील दुकानात गेलेबाबत सांगीतले. त्यावेळी जयेश पांचाळ याच्याकडे चौकशी केली असता तो मिसिंग व्यक्ती नामे रिकी वाघेला हे त्याच्याकडे दिनांक २६/०८/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वाजेच्या सुमारास आले असल्याचे सांगुन ते दुपारी ०३.३० वाजेला त्याच्या दुकानातुन निघुन गेले असल्याचे सांगत होता मात्र मिसींग व्यक्ती त्याचे दुकानाचे बाहेर जात असल्याचे कुठेही तांत्रीक तपासामध्ये आढळून आले नाही. त्यानंतर जयेश पांचाळ याचेकडे अधिक विचारपूस केली असता तो समाधानकारक उत्तर देत नसल्याने अधिक तांत्रीक तपास करुन इतर साक्षीदाराकडे विचारपूस केली असता यातील मिसींग व्यक्ती रिकी वाघेला व त्याच्यामध्ये जुन्या आर्थिक देवाणघेवाण वरुन वाद

झाल्याने जयेश पांचाळ याने रिकी वाघेला याचा गळा दाबून त्याचेच दुकानामध्ये खून केला असल्याचे व सदरचा मृतदेह एका लाकडी कपाटामध्ये भरुन दुर अंतरावर नेवून टाकल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाल्याने दिनांक ३/९/२०२२ रोजी अर्नाळा पोलीस ठाणे येथे गुन्हा.रजि.क्र.२८४/२०२२ भा.द.वि.स कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यास अटक करण्यात आली होती.

सदरच्या मनुष्य मिसींग प्रकरणामध्ये विरार पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने कौशल्यपुर्वक माहिती काढून खूनाच्या गुन्हयाचा छडा लावून आरोपीतास पुराव्यानिशी अटक केल्याने सदरची कामगिरी करण्या-या श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप राख, पोलीस निरीक्षक, पोउपनि. संदेश राणे, पोलीस उप निरीक्षक, पो.हवा. सचिन लोखंडे, विजय सुर्यवंशी, संदिप शेरमाळे, पोशि/ संदिप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, सुनिल पाटील, रवी वानखेडे, युवराज वाघमोडे, सागर घुगरकर सर्व नेमणुक- विरार पोलीस ठाणे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **सप्टेबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री सुरेश वराडे.**

**३)** दिनांक २५/०९/२०२२ रोजी पहाटे ०४.०० वा ते ०७.०० वाजेच्या दरम्यान वज्रेश्वरी ते शिरसाड बाजुकडे जाणा-या रोडवर पारोळ नाका पासुन अंदाजे ५०० मीटर शिरसाड बाजुकडे, ता. वसई फिर्यादी नामे राजकुमार रामआधार सिंग हे त्यांच्या ताब्यातील ट्रेलर क्रमांक एम.एच.४८ ए.वाय.८७२४ या ट्रेलरमध्ये १७,२०,०००/- रुपये किंमतीचे २७ टन लोखंडी सळई व ३७० किलो एम.एस. बेंडीग लोखंडी वायर असे भरुन जात असतांना पाच अनोळखी इसमांनी त्यांच्या ताब्यातील चार चाकी कारने ट्रेलरला अडवून ट्रेलरमध्ये चढून त्यापैकी एका इसमाने गावठी कट्टा दाखवुन फिर्यादीचा जबरदस्तीने मोबाईल काढून धक्काबुक्की व मारहाण करुन फिर्यादीस ड्रायव्हरच्या मागील सिटवर झोपवुन तोंडवर कापड टाकुन ट्रेलर चालवुन घेवुन त्यांना वाटेत शिरसाड नाका ते विरार फाटा दरम्यान त्यांच्याकडील चारचाकी कारमध्ये जबरदस्तीने घालुन, डोळ्यावर पट्टी बांधुन, त्याच्या ताब्यातील मालाने भरलेला ट्रेलर असा ४२,२१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल दरोडा टाकुन घेवुन गेले व फिर्यादी यांना खानिवडे टोलनाक्याच्या पुढे मुंबई बाजुकडे जाणाया हायवेवर सोडले होते. सदर घटनेबाबत मांडवी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १२१/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९५ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ प्रमाणे अज्ञात आरोपीत विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष ३ विरारच्या पोलीस पथकाने वेगवेगळे पथक तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांची तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन गुन्हा घडल्याच्या ३६ तासाच्या आत सापळा रचुन आरोपीत नामे १) नौशाद अहमद मुस्ताक अहमद, वय २४ वर्षे, २) मोहमद समीर मोहम्मद जमील कुरेशी, वय २१ वर्षे, ३) मेहताब आलम नसरत अली, वय २९ वर्षे, ४) मोहम्मद दानिश मोहमंद वासिफ खान, वय २० वर्षे यांना दिनांक २६/९/२०२२ रोजी शिताफीने ताब्यात घेतले आहे होते. त्यांचे कडुन दोन अग्निशस्त्र व एक जिवंत काडतुस व गुन्हयात वापरलेली कार असा एकूण ९,३०,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन सदर आरोपीतांना अटक करण्यात आली होती.

सदरची कामगिरी करण्या-या गुन्हे शाखा कक्ष ३ चे पो.नि. प्रमोद बडाख, पोउपनि शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सागर बारवकर, अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, पो.ना. मनोज सकपाळ, संग्राम गायकवाड, पो.अं. अश्विन पाटील, सुमित जाधव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेमणूक सायबर सेल, म.सु.ब. किशोर राठोड यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **सप्टेबर महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल क्रमांक -३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि. श्री प्रमोद बडाख.**

४) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर ऑटोरिक्षा व मोटारसायकलने प्रवास करणा-या प्रवाशांचे मोबाईल जबरीने चोरी करणाच्या घटना गेल्या काही दिवसांपासुन घडत होत्या. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष-२ वसई यांनी वेगवेगळी पथके तयार करुन जबरी चोरी झालेल्या गुन्हयांच्या घटनास्थळांना भेटी देवून तांत्रिक पुरावे हस्तगत करुन व गुप्त बातमीदाराकरवी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीत ईसम नामे १) ऊझेर शाहीद अन्सारी वय २१ वर्षे रा. वायफाय हॉटेलचे समोरील चाळ, आयुबी चौक, मालेगाव, जिल्हा- नाशिक २) सलमान हारुन अन्सारी रा. सोफिया अपार्टमेंट, रुम नं ४०७, रज्जाक कंपाऊंड, कारोली रोड, भिवंडी ३) उसैर फुरकान अन्सारी वय २२ वर्ष रा. औचित पाडा, नाशिक रोड भिवंडी यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे केलेल्या चौकशीत वालीव पोलीस ठाणे आणि पेल्हार पोलीस ठाणेस दाखल जबरी चोरीच्या खालील १३ गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली होती. नमुद आरोपीतांकडुन वालीव व पेल्हार पोलीस ठाणेकडील दाखल असलेल्या १३ गुन्हयांची उकल होवून सदर गुन्हयातील विविध कंपन्यांचे मोबाईल व गुन्हयात वापरण्यात आलेली मोटार सायकल असा एकुण २,०८,४९०/- रुपये

किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. उपरोक्त आरोपीतांना अटक करण्यात आल्याने सदर प्रकारच्या गुन्हांना आळा बसण्यास मदत झालेली आहे.

सदरची कामगिरी करणाऱ्या गुन्हे शाखा-२ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक श्री शाहुराज रणवरे, सपोनिरी/ सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/ रमेश भोसले, पो.हवा. मंगेश चव्हाण, संजय नवले, महेश पागधरे, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, पोना/ रमेश आलदर, पो.कॉ. अमोल कोरे, दादा आडके, सुधीर नरळे यांचा दिनांक ८/१०/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी **'सप्टेबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड'** देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना पोनि. श्री शाहूराज रणवरे**

५) वालीव पोलीस ठाण्याचे कार्यकक्षेत दिनांक २६/०८/२०२२ रोजी दुपारी १३.३० वा.चे पुर्वी कोणीतरी अज्ञात आरोपीने मयत अनोळखी मुलगी वय. अंदाजे १५ ते १७ वर्षे हिस अज्ञात कारणावरुन कोणत्यातरी धारदार हत्याराने पोटावर वार करुन व इतर हत्याराने मारहाण करुन गंभिर स्वरुपाच्या दुखापती करुन जिवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्यासाठी तिचे प्रेत काळया व खाकी रंगाचे बॅगमध्ये भरुन नायगाव स्टेशन ते परेरानगर रोडवर, नायगाव पुर्व पश्चिम ब्रीजचे उत्तरेस सुमारे २०० मीटर अंतरावर, रोडचे कडेला झाडी झुडूपामध्ये फेकून दिल्याबाबत गुन्हा नोंद क्र. I ८५८/२०२२ भा.द.वि.सं कलम ३०२,२०१ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गंभीर स्वरुपाच्या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी व वालीव गुन्हे प्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनास्थळास भेट दिली. घटनास्थळावर अल्पवयीन मुलीच्या संदर्भाने मिळालेल्या पुराव्याच्या आधारे मुलीच्या पत्त्याचा शोध लागला, सदर मुलीचे अपहरणाबाबत अंधेरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर अल्पवयीन मुलीच्या घरी अधिक चौकशी केली असता मुलीचा संतोष मकवाना नावाचा मित्र असल्याची व सदर अल्पवयीन मुलगी ही त्यांच्यासोबत गेली असल्याचा संशय मुलीचे घरच्यांनी व्यक्त केला होता.संशयीत संतोष मकवाना याच्या राहत्या घरी जावुन त्याचा शोध घेतला असता तो दोन दिवसापासुन घरी नसून त्याचीही मिसींग तक्रार नोंद होती. तेव्हा तांत्रीक पुराव्यांच्या आधारे आरोपी निष्पन्न झाले. सदर आरोपीतांना पकडण्याकामी पालनपुर येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने दिनांक ०३/०९/२०२२ रोजी ताब्यात घेवुन गुन्हयातील आरोपीत नामे १.संतोष मगन मकवाना रा.खार मुंबई २.विशाल दिपक अनभवणे रा.जुहु मुंबई,यांना गुजरात येथुन यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली होती.

सदरची कामगिरी करणाऱ्या वालीव पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राहुलकुमार पाटील, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मोहन परकाळे, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर,राजेंद्र फड, पोना /सतिश गांगुर्डे, पो.अंम.श्रीकांत पाटील, गजानन गरीबे, सचिन मोहीते,

सचिन खताळ, जयवंत खंडवी, दिपक पाटील यांचा दिनांक ८/१०/२०२२ रोजी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त यांनी **'सप्टेबर महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणून स्पेशल रिवॉर्ड क्र-२'** देवून सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारतांना वपोनि. श्री कैलास बर्वे**

---------------------oooo--------------------------